वाचले :- १) क्र.माविभो/०१/कावि/५३२/२०२४ दि.०२/०८/२०२४
२) क्र.माविभो/०१/कावि/५९६/२०२४ दि.२१/०८/२०२४
३) क्र.माविभो/०१/कावि/६५९/२०२४ दि.२१/०९/२०२४
४) क्र.माध्य/शि/०१/कावि/७४७/२०२४ दि.२६/०९/२०२४.
२) श्री.पाटील रविराज अरूण, शिक्षणसेवक यांचा दि.३०/०९/२०२४ रोजीचा खुलासा.
३) माध्यमिक शिक्षण विभागाचा दि.२७/१२/२०२४ रोजीचा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
माध्यमिक शिक्षण विभाग
क्र.माध्य/शि/०१/कावि/१००३/२०२४
दि २७/१२/२०२४

विषय – सक्त ताकीद देणेबाबत....

आदेश,

तुम्ही पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमिक शिक्षण विभागाच्या अंतर्गत माध्यमिक विद्यालय,भोसरी या विद्यालयात शिक्षणसेवक या जबाबदारीच्या पदावर कार्यरत आहात.तुम्हाला शिक्षणसेवक पदाची जबाबदारी व कर्तव्य ज्ञात असणे तुम्हास आवश्यक आहे.

तुम्ही विद्यालयात रूजू झाल्यापासून ४६ दिवस विनापरवाना गैरहजर राहिलेले आहात.तुमच्या या विनापरवाना गैरहजेरीमुळे विद्यालयातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झालेले आहे. याबाबत तुम्ही स्वत: जबाबदार आहात.तसेच तुम्ही विद्यालयात मुख्याध्यापक यांच्याशी संवाद साधताना उध्दटपणे वर्तन केलेले दिसून आलेले आहे. तुम्हास याबाबत मुख्याध्यापक माध्यमिक विद्याल,भोसरी यांच्याकडील वाचले क्र.०१ ते ०३ अन्वये ज्ञापन देण्यात आलेले आहे.सदर ज्ञापनाचा खुलासा तुम्ही विहित मुदतीत सादर केलेला नाही.त्यानंतर वाचले क्र.०४ अन्वये तुम्हास नोटीस देण्यात आलेले होती.सदर नोटीसचा खुलासा वाचले क्र.०५ अन्वये सादर केलेला आहे.सदर खुलासा दिशाभूल करणारा असल्याचे दिसून येत आहे.

तरी, त्यामुळे सदर प्रकरणी तुम्हाला शैक्षणिक व प्रशासकीय बाबींच्या सुधारण्याच्या दृष्टीकोनातून एक वेळ संधी देवून तुमचा खुलासा मान्य करणेत येत आहे.तसेच तुम्हास या आदेशान्वये सक्त ताकीद देणेत येते की, तुम्ही यापुढे उशीरा येणे,विद्यालयात विनापरवाना गैरहजर राहणे,मुख्याध्यापकांशी उध्दट बोलणे याप्रकारच्या पुन्हा तक्रारी प्राप्त झाल्यास महाराष्ट्र महानगरपालिका कलम-५६(२)"ड"अन्वये नियमाधिन प्रशासकीय कारवाई करण्यात येईल याची स्पष्ट नोंद घ्यावी.

(विजयकुमार थोरात)
सहाय्यक आयुक्त
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८.

प्रती,

श्री.पाटील रविराज अरूण, शिक्षणसेवक

मा.वि.भोसरी

प्रत,

१) मुख्याद्यापक मा.वि.भोसरी

२/- सदर आदेश संबधीतांना बजाउन पुर्तता अहवाल इकडिल कार्यालयास सादर करणेत यावा.

२)मा.अतिरिक्त आयुक्त (१),

मा.माहितीसाठी सविनय सादर.